# महाराष्ट्र राज्य पोलीस बिनतारी संदेश विभाग
## प्रसिध्दीपत्रक माहे मार्च - २०१७

**क्र.क / ५ / प्रसिद्धीपत्रक / ०३ / २०१७ दिनांक :- १७/०४/२०१७**

**१.नेमणूक / सेवासमाप्ती :- निरंक**

**2.पदोन्नती / पदावनती :-**

खालील नमूद प्रमुख यंत्रचालक ते पोलीस उप-निरीक्षक बिनतारी संदेश (वाहतुक) या पदावर तात्पुरते ११ महिन्याकरीता पदोन्नतीचे आदेश निर्गमित करणेत आलेले आहेत. त्यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या ठिकाणामध्ये बदल करण्याबाबत विनंती अर्ज सादर केले. सदर अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या कौटुंबिक अडचणी नमूद करुन समक्ष कथन केल्याने पोलीस आस्थापना मंडळाने त्यांच्या विनंतीचा विचार करुन सदरील आदेशामध्ये त्यांच्या पदोन्नती बदलीच्या ठिकाणामध्ये खालीलप्रमाणे अंशतः बदल करणेत येत आहे. नमुद अधिकारी यांची त्यांचे विनंती नुसार पदोन्नतीच्या ठिकाणामध्ये बदल करण्यात आल्याने त्यांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. तसेच ते पदोन्नतीवर ज्या दिवशी हजर होतील तो त्यांचा सेवाज्येष्ठता दिनांक धरण्यात येईल. तसे त्यांचेकडुन लेखी हमीपत्र प्राप्त करुन घेऊन ते पत्र त्यांचे सेवापुस्तकात डकवुन त्या हमी पत्राची एक प्रत इकडील कार्यालयास सादर करावी

| अ.क्र. | प्रयंचा / सपोउपनि यांचे नांव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण / आस्थापना | पदोन्नतीवरील नेमणुकीचे ठिकाण / आस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | देशपांडे सुनिल कृष्णाजी | गट क्र.१० सोलापुर, समादेशक, रा.रा.पो.बल.गट क्र.१०, सोलापुर | सोलापुर ग्रामीण ऐवजी पोलीस अधीक्षक , अमरावती ग्रामीण | त्यांचे विनंतीवरुन रिक्त पदी |
| २ | गाडे दत्तात्रय रघुनाथ | गट क्र.५ दौंड, समादेशक, रा.रा.पो.बल. गट क्र.५ दौंड | सिंधुदुर्ग ऐवजी , समादेशक, रा.रा.पो.बल. गट क्र. ५ दौंड | त्यांचे विनंतीवरुन रिक्त पदी |
| ३. | शेख शौकतअली मोहिन्न | सोलापुर शहर, पोलीस आयुक्त , सोलापुर शहर | गट क्र. ५ दौंड ऐवजी , पोलीस अधीक्षक, सोलापुर ग्रामीण | त्यांचे विनंतीवरुन रिक्त पदी |
| ४. | जाधव शिवशंकर सिद्राम | सोलापुर शहर, पोलीस आयुक्त , सोलापुर शहर | अमरावती ग्रामीण ऐवजी पोलीस अधिक्षक , सिंधुदुर्ग | त्यांचे विनंतीवरुन रिक्त पदी |

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-१/ पोउनिबिसं(वाह)/बदली/पदोन्नती/२०१७/१४२० दि.१७/०३/२०१७)**

**३. सेवानिवृत्ती / स्वेच्छासेवानिवृत्ती :-**

१. श्री. रमेश मुरलीधर शिरसाठ, पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतुक), नेमणुक कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई यांना दि. ०१/०४/२०१७ रोजी वयाची ५८ वर्षे पूर्ण होत असल्यामुळे, त्यांना वरील संदर्भांकित आदेशान्वये व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र. ६२(१) नुसार दि. ३१/०३/२०१७ रोजी कार्यालयीन वेळेनंतर नियत वयोमनानुसार सेवानिवृत्त करण्यात येत आहे. त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले

नसल्याने त्यांना लागू असलेली सेवानिवृत्ती वेतन व इतर फायद्यांची कार्यवाही घ्यावी. श्री. रमेश मुरलीधर शिरसाठ, पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतुक), नेमणुक बि.सं. कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई यांना दि. ३१/०३/२०१७ रोजी कार्यालयीन वेळेनंतर सेवा मुक्त करण्यात यावे. पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. त्यांचे नांव दि. ०१/०४/२०१७ रोजी पासुन हजेरी पट व इतर शासकीय अभिलेखावरुन कमी करण्यात यावे, तसेच त्यांच्याकडील ओळखपत्र जमा करुन घेण्यात यावे. श्री. रमेश मुरलीधर शिरसाठ, पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतुक), नेमणुक बि.सं. कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई यांचे सेवानिवृत्ती मुळे दि. ०१/०४/२०१७ पासुन रिक्त होणारे पदाचा अतिरीक्त कार्यभार हा श्री.व्ही.टी.पाटील, पोलीस निरीक्षक बि.सं.(वाह) नेमणुक रा.रा.पो.बल.गट क्र.१ पुणे यांचेकडे पुढील आदेश होईपर्यंत सोपविण्यात यावा.

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-१/ पोउनिबिसं(वाह)/निवसेनि/२०१७/१७०० दि.३०/०३/२०१७)**

२.श्री. श्रीकांत मधुकर नाईक, पोलीस उप-निरीक्षक बिनतारी संदेश (वाहतुक), नेमणुक बिनतारी संदेश मध्यवर्ती भांडार, पुणे यांना दि. १७/०३/२०१७ रोजी वयाची ५८ वर्षे पूर्ण होत असल्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्र.६२(१) नुसार दि. ३१/०३/२०१७ रोजी कार्यालयीन वेळेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात येत आहे. त्यांना नियमानुसार लागू असलेले सेवानिवृत्तीचे सर्व फायदे, काही शासकीय येणे वसुली असलेस ती वजाती करुन, त्यानंतर अनुज्ञेय आहेत.

श्री. श्रीकांत मधुकर नाईक, पोलीस उप-निरीक्षक, बिनतारी संदेश (वाहतुक), नेमणुक बिनतारी संदेश मध्यवर्ती भांडार, पुणे यांना दि. ३१/०३/२०१७ रोजी कार्यालयीन वेळेनंतर सेवा मुक्त करण्यात यावे व पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा .त्यांचे नांव दि. ०१/०४/२०१७ रोजी पासुन हजेरी पट व इतर शासकीय अभिलेखावरुन कमी करण्यात यावे. तसेच त्यांच्याकडील ओळखपत्र जमा करुन घेण्यात यावे.

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-१/ पोउनिबिसं(वाह)/निवसेनि/२०१७/१६९९ दि.३०/०३/२०१७)**

**४. बदली :- निरंक**

**५. बक्षिस :**

१. कामगिरीचा तपशील :- खालील नमूद कर्मचारी यांनी अपर पोलीस महासंचालक व संचालक, म.राज्य ,पुणे यांचे कार्यालय येथे चालु असलेल्या प्रशिक्षणाच्या दरम्यान प्रशिक्षणार्थींना योग्य वेळेत वैद्यकीय मदत मिळेल याबाबत वाहन चालक म्हणुन चांगली कामगिरी बजाविली याबाबत त्यांना प्रोत्साहनपर बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नांव | हु-ा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.टी. एस.माने | चा.पो.शि. | कोल्हापुर जिल्हा, प्र.नि.प्रशिक्षण केंद्र, पुणे | रु.१५०/- व जीएसटी |

**( अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई/७/७०६/बक्षिस/२०१७/१२४५, दि.०६/०३/२०१७ )**

२. कामगिरीचा तपशील :-खालील नमूद कर्मचारी यांनी CRIME TRACKER PROJECT DEVELOPMENT करीता आवश्यक असलेले COMPUTER हे DY.S.P.COMPUTER CELL यांच्या संमतीने घेऊन त्यांची स्वतः दुरुस्ती केली. तसेच जवळच्या उपलब्ध Internet Modem मार्फतीने LAN Connection जोडले. Programming करीता आवश्यक असलेले Operating System, MS Office २००७ JAVA Development Kit Ecllips, Mysql with Workbench इत्यादी softwares चे Installation स्वतः काळजीपूर्वक योग्य पध्दतीने केले. या उत्कृष्ट कामगिरीबाबत त्यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नांव | हु-1 | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.ए.सी.महिंद्रकर | स.पो.उप.नि/ रे.यां. | संशोधन व विकास, पुणे | रु.५००/- व जीएसटी |

३.कामगिरीचा तपशील :- सॉफ्टवेअरच्या विकासाचे काम जलद गतीने व्हावे, त्यासाठीची आवश्यक असणारी अनुषांगीक माहिती यासह MRSAC कडील सॉफ्टवेअरचे विकसक यांना भेटणे, याकामी नमूद कर्मचारी यांनी याबाबतीत त्यांचा असलेला सखोल अभ्यास, अनुभव व विस्तारीत ज्ञान याचा पुरेपुर वापर करुन त्यांनी MRSAC कडील सॉफ्टवेअर विकसक यांची नागपुर येथे भेट घेणेसाठी स्वतः पुढाकार घेतला. त्यांनी या प्रकल्पावर नागपुर येथे सलग ४ दिवस अभ्यास करुन काम केले. यासाठी त्यांनी संगणकीय ज्ञान, तर्कशास्त्र, प्रसिध्द व संबंधित लेख, अन्य अनुषांगिक साहित्याचा पुरेपुर वापर केला. या सॉफ्टवेअरचे कामास गती प्राप्त होऊन त्याचा फलदायी परिणाम प्राप्त व्हावा याकरीता त्यांनी स्वतः संचालक MRSAC यांची भेट घेतली. त्यांच्या या कृतीमुळे तसेच वेळोवेळी संबंधितांना दिलेल्या भेटीमुळे सॉफ्टवेअरच्या पुर्ततेस अंतिम स्वरुप देण्यामध्ये मोलाची मदत झाली. या उत्कृष्ट कामगिरीबाबत त्यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नांव | हु-1 | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.ए.सी.महिंद्रकर | सपोउपनि/रेयां | संशोधन व विकास, पुणे | रु. ६००/- व जीएसटी |

४. कामगिरीचा तपशील :- CCTNS मध्ये जो CRIME TRACKER PROJECT असतो तो अल्पकालावधीत अचुकतेने तसेच राज्य नियंत्रण कक्षाकडील माहितीविना कसा कार्यन्वित होऊ शकतो यासाठी वेब सर्व्हीससाठी आवश्यक असणा-या संबंधित बाबीवर सखोल अभ्यास करुन त्याची सविस्तर माहिती देऊन त्याचे उत्तमप्रकारे सादरीकरण केले. या संदर्भातील वापरावयाचे मॅकॅनिझम, अनावश्यक हस्तक्षेप झाल्यास त्यास वेब सर्व्हीस व्दारा होणारा प्रतिबंध याबाबत स्पष्टीकरण केले. यासंबंधाने अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) म.रा.मुंबई व SCRB चे अधिकारी, विप्रोचे CCTNS & WPC चे प्रकल्पधिकारी यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये यासाठी डाटा संबंधाने आवश्यक असणा-या बाबी, तांत्रिक बाबी इ.मुद्दयांवर ठाम विश्वासाने स्पष्टीकरण सादर केले. तसेच त्यांनी याकामास अधिक गती प्राप्त व्हावी याकरीता यामध्ये येणा-या अडचणी व त्यावरील उपायोजना यासंबंधाने आवश्यक तो पाठपुरावा केला. त्यांच्या सक्रीय कृतीमुळे अल्पावधीत वेब सर्व्हीस कार्यान्वीत होण्यामध्ये सुलभता निर्माण झाली. CRIME TRACKER PROJECT अधिक कार्यक्षम बनविण्यामध्ये त्यांच्या बौध्दिक निर्णयाचा मोठा सहभाग आहे. या उत्कृष्ट कामगिरीबाबत खालील नमूद कर्मचारी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-1 | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. ए.सी.महिंद्रकर | सपोउपनि/ रेयां | संशोधन व विकास, पुणे | रु.७००/- व जीएसटी |

५. कामगिरीचा तपशील :- पोलीस उप-अधिक्षक, संगणक कक्ष यांची पदोन्नती झाल्याने खालील नमूद कर्मचारी यांनी CRIME TRACKER PROJECT या शाखेच्या विकसक व्यवस्थापक व समन्वयक या पदाची आव्हानात्मक जबाबदारी स्विकारली. पॉलीगॉन मॅपींग करण्यासाठी MRSAC मध्ये वापरण्यात येणारे तंत्र, कलृप्ती, ARCGIS या सॉफ्टवेअरचा वापर याचा बारकाईने अभ्यास केला. त्यांनी या बाबी आत्मसात करुन कमीत कमी वेळेत जिल्हयाचा नकाशा तयार करण्यामध्ये ते यशस्वी झालेले आहेत. त्यांची कुशल बुध्दी, कोकण परिक्षेत्रातील नोडल ऑफीसर, उत्कृष्ट व्यवस्थापन MRSAC चा सकारात्मक वापर यामुळे फक्त ६ दिवसांमध्ये अचुकतेने ते नकाशे पूर्ण करु शकले. या उत्कृष्ट कामगिरीबाबत त्यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-द्दा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. ए.सी.महिंद्रकर | सपोउपनि/ रेयां | संशोधन व विकास, पुणे | रु.५००/- व जीएसटी |

६. कामगिरीचा तपशील :- CRIME TRACKER PROJECT विकसित करणे, त्यामध्ये अचुकता येणे, अद्यावत माहिती उपलब्ध होणे या व अन्य अनुषांगिक बाबींसाठी खालील नमूद कर्मचारी यांनी पोलीस ठाण्यांना भेटी देऊन CCTNS डाटा, एंट्रि संबंधि अहवाल एकत्र केले. APA व CID या शाखेकडील वार्षिक व मासिक अहवालांचा बारकाईने अभ्यास केला. तसेच SCRB च्या अधिका-यांना भेटुन अत्यंत आवडीने CRIME TRACKER PROJECT बाबत सखोल अभ्यास केला. याकामी MRSAC चे प्रमुख शास्त्रज्ञ व विकसक यांना प्रत्यक्ष भेटुन उत्तम प्रकारे सादरीकरण केले. खालील नमूद कर्मचारी यांच्या या सक्रिय CRIME TRACKER PROJECT MRSAC ला फलदायी अंतिम स्वरुप मिळण्यास मोलाची मदत झाली. या उत्कृष्ट कामगिरीबाबत त्यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-द्दा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षिस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. ए.सी.महिंद्रकर | सपोउपनि/ रेयां | संशोधन व विकास, पुणे | रु.५००/- व जीएसटी |

७. कामगिरीचा तपशील :-कच्चा नकाशा काढणेसाठी मोठी अडचण असते ती गांवाची नांवे, चुकीची, संबंधीत व अपुरी माहिती इ.असे प्रकार टाळण्यासाठी किंवा अचुक व अद्यावत माहिती प्राप्त व्हावी याकरीता खालील नमूद कर्मचारी यांनी वैयक्तीक व कार्यालयीन संबंधाचा व माध्यमांचा परिणामकारक वापर केला. याकरीता त्यांनी राज्यातील सर्व नोडल अधिकारी यांच्यासाठी दोन स्वतंत्र वेळा निश्चित केल्या. त्यापैकी एकावेळी त्यांनी नागपुर येथे नागपुर व अमरावती परिक्षेत्रातील नोडल अधिकारी यांच्यासाठी एकवेळ निश्चित केली व अन्य नोडल अधिकारी यांच्यासाठी मुंबई येथे दुसरी स्वतंत्र वेळ निश्चित केली. त्यांनी वरील संबंधाने योग्य प्रकारे नियोजन करुन व समजावुन सांगुन पोलीस ठाण्याच्या हद्दी निश्चितीकरीता MRSAC च्या सुविधांचा सुलभतेने वापर केला. या कालावधीत राज्य निवडणुक प्रक्रिया सुरु असतानादेखील विनातक्रार या कार्यशाळा पार पडलेल्या आहेत. याकामी त्यांनी केलेले शिस्तबध्द, नियोजन यामुळे या मोहिमेचा हा परिणाम झाला की, ७५% नकाशाचे काम केवळ ११ दिवसांत अचुकतेने पुर्ण झाले. त्यांचे या कामातील सातत्य , अखंड परिश्रम, योग्य नियोजन, व्यवस्थापकीय वृत्ती यामुळे हा प्रकल्प यशस्वीपणे पार पडलेला आहे. या उत्कृष्ट कामगिरीबाबत त्यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-द्दा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षिस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. ए.सी.महिंद्रकर | सपोउपनि/ रेयां | संशोधन व विकास, पुणे | रु.६००/- व जीएसटी |

८. कामगिरीचा तपशील :-खालील नमूद कर्मचारी यांनी प्रशिक्षणार्थी यांचे दिक्षांत संचलनाचेवेळी प्रमुख पाहुणे यांचेसाठी डायस तयार केले. तसेच वसतिगृह येथील दरवाजे व इतर फर्निचरची दुरुस्ती उत्तमरित्या केली. याबाबत त्यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-द्दा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.आर. ए.हरिभक्त | पो.हवा./ सुतार | संशोधन व विकास, पुणे | रु. १५० /- व जीएसटी |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७ / ७०६ / बक्षिस / २०१७ /१२४५, दि.०६/०३/२०१७**

९. कामगिरीचा तपशीलः- पोलीस उप-महानिरीक्षक, बि.सं. पुणे यांनी पोलीस उप-अधिक्षक बि.सं. अमरावती परिक्षेत्र, येथील सन २०१६-१७ ची वार्षिक तपासणी दि. २७/०२/२०१७ ते ०२/०३/२०१७ या कालावधीत घेतली. बक्षीस पत्रातील नमूद अधिकारी / कर्मचारी यांनी पोलीस उप-अधीक्षक, बि.सं. अमरावती परिक्षेत्र कार्यालयाचे वार्षिक तपासणीचे वेळी , तपासणी नोंदी घेणे, त्रुटींची जागेवरच पुर्तता करुन घेणे, तपासणी नोंदीचा अहवाल कमी

वेळेत तयार करणेचे कामकाज उत्कृष्टपणे केलेबाबत खालील नमूद अधिकरी यांना उत्तजेनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-ा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. ए.के. डुंबरे | पो.नि.बि.सं.(अभि) | कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई | रु. १५००/- व सी नोट |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७ / ७०६ / बक्षिस / २०१७ /१३६५, दि.१५/०३/२०१७**

१०. कामगिरीचा तपशीलः- पोलीस उप-महानिरीक्षक, बि.सं. पुणे यांनी पोलीस उप-अधिक्षक बि.सं. अमरावती परिक्षेत्र, येथील सन २०१६-१७ ची वार्षिक तपासणी दि. २७/०२/२०१७ ते ०२/०३/२०१७ या कालावधीत घेतली. बक्षीस पत्रातील नमूद अधिकारी / कर्मचारी यांनी पोलीस उप-अधीक्षक, बि.सं. अमरावती परिक्षेत्र कार्यालयाचे वार्षिक तपासणीचे वेळी , तपासणी नोंदी घेणे, त्रुटींची जागेवरच पुर्तता करुन घेणे, तपासणी नोंदीचा अहवाल कमी वेळेत तयार करणेचे कामकाज उत्कृष्टपणे केलेबाबत खालील नमूद अधिकरी यांना उत्तजेनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-ा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. ए.एम.नवले | पो.उप-निरी .बि.सं.(वाह) | म.त.का.पुणे | रु. १०००/- व सी नोट |
| ०२ | श्री.एस.एस.कुंभार | सपोउनि/ रे.यां. | फ-शाखा, संचालक कार्या. पुणे | रु.७५०/- व जीएसटी |
| ०३ | श्री.व्ही.डी.नाईक | सपोउनि/प्र.यं.चा. | सायफर , पुणे | रु.७५०/- व जीएसटी |
| ०४ | श्री.डी.एस. माने | सपोउनि/भां.पा. | संशोधन व विकास, पुणे | रु.७५०/- व जीएसटी |
| ०५ | श्री.के.डी.धाडगे | पोहवा/बि.यं.चा | गोनपायो, पुणे | रु.७५०/- व जीएसटी |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७ / ७०६ / बक्षिस / २०१७ /१३६५, दि.१५/०३/२०१७ )**

११. कामगिरीचा तपशील :- पोलीस उप-महानिरीक्षक, बि.सं. पुणे यांनी पोलीस उप-अधिक्षक बि.सं.व्ही-सॅट , पुणे येथील दि. ०१/०१/२०१५ ते सन २०१६-१७ ची वार्षिक तपासणी दि. १५/०३/२०१७ ते १८/०३/२०१७ या कालावधीत घेतली. खालील नमूद अधिकारी / कर्मचारी यांनी पोलीस उप-अधिक्षक बि.सं. व्ही-सॅट, कार्यालयाचे वार्षिक तपासणीची वेळी, तपासणी नोंदी घेणे, त्रुटींची जागेवरच पुर्तता करुन घेणे, तपासणी नोंदीचा अहवाल कमी वेळेत तयार करणेचे कामकाज उत्कृष्टपणे केलेबाबत खालील नमूद अधिकारी / कर्मचारी यांना उत्तजेनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-ा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.शैलेश के.चव्हाण | पो.नि.बि.सं.(अभि.) | संशोधन व विकास, पुणे | रु. १५००/- व सी नोट |
| ०२ | श्री.एस.पी.ससाणे | पो.उपनि.बि.सं. | संशोधन व विकास, पुणे | रु.१०००/- व सी नोट |
| ०३ | श्री.पी.एन.कदम | सपोउनि/रे.यां. | संशोधन व विकास ,पुणे | रु.७५०/- व जीएसटी |
| ०४ | श्रीमती आर.एस.कुलकर्णी | पोहवा / बि.यं.चा | म.त.का.पुणे | रु.५००/- व जीएसटी |
| ०५ | श्रीमती एन.ए.सावंत | पोहवा/बि.यं.चा | गोनपायो, पुणे | रु.५००/- व जीएसटी |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७ / ७०६ / बक्षिस / २०१७ /१५४९, दि.२२/०३/२०१७ )**

१२. कामगिरीचा तपशील :- पोलीस उप-महानिरीक्षक, बि.सं. पुणे यांनी पोलीस उप-अधिक्षक बि.सं.व्ही-सॅट , पुणे येथील दि. ०१/०१/२०१५ ते सन २०१६-१७ ची वार्षिक तपासणी दि. १५/०३/२०१७ ते १८/०३/२०१७ या कालावधीत घेतली. खालील नमूद अधिकारी / कर्मचारी यांनी पोलीस उप-अधिक्षक बि.सं. व्ही-सॅट, कार्यालयाचे वार्षिक तपासणीची वेळी, तपासणी नोंदी घेणे, त्रुटींची जागेवरच पुर्तता करुन घेणे, तपासणी नोंदीचा अहवाल कमी वेळेत तयार करणेचे कामकाज उत्कृष्टपणे केलेबाबत खालील नमूद अधिकारी / कर्मचारी यांना उत्तजेनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-१ | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.पी.व्ही.कुलकर्णी | सपोउनि/प्र.यं.चा. | मुंबई शहर | रु.७५०/- व जीएसटी |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७ / ७०६ / बक्षिस / २०१७ /१५४६, दि.२२/०३/२०१७ )**

१३. कामगिरीचा तपशील :- पोलीस उप-महानिरीक्षक, बि.सं. पुणे यांनी पोलीस उप-अधिक्षक बि.सं.सायफर , पुणे येथील सन - २०१६ ची वार्षिक तपासणी दि. ०६/०२/२०१७ ते ०७/०२/२०१७ या कालावधीत घेतली. बक्षीस पत्रातील नमूद लिपीक यांनी पोलीस उप-अधिक्षक, बि.सं. सायफर, कार्यालयाचे वार्षिक तपासणीचे वेळी, तपासणी नोंदी घेणे, त्रुटींची जागेवरच पुर्तता करुन घेणे, तपासणी नोंदीचा अहवाल कमी वेळेत तयार करणेचे कामकाज उत्कृष्टपणे केलेले आहे. यास्तव सदरचे कर्मचारी यांना उत्तेजनार्थ मानधन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-१ | नेमणूकीचे ठिकाण | मानधन रक्कम रुपये वेतनाच्या ५ % |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती ए.एस.कुलकर्णी | वरिष्ठ श्रेणी लिपीक | आस्थपना शाखा, संचालक कार्यालय, पुणे | रु.७०० /- |
| ०२ | श्रीमती आर .एस. भोसले | कनिष्ठ श्रेणी लिपीक | खरेदी शाखा, संचालक कार्यालय, पुणे | रु. ४७७/- |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७ / ७०६ / मानधन / २०१७ /१५४७, दि.२२/०३/२०१७ )**

१४. कामगिरीचा तपशील :- पोलीस उप-महानिरीक्षक, बि.सं. पुणे यांनी पोलीस उप-अधिक्षक बि.सं.सायफर , पुणे येथील सन - २०१६ ची वार्षिक तपासणी दि. ०६/०२/२०१७ ते ०७/०२/२०१७ या कालावधीत घेतली. खालील नमुद अधिकारी / कर्मचारी यांनी पोलीस उप-अधिक्षक, बि.सं. सायफर, कार्यालयाचे वार्षिक तपासणीचे वेळी, तपासणी नोंदी घेणे, त्रुटींची जागेवरच पुर्तता करुन घेणे, तपासणी नोंदीचा अहवाल कमी वेळेत तयार करणेचे कामकाज उत्कृष्टपणे केलेबाबत खालील नमुद अधिकरी / कर्मचारी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-१ | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री बी.डब्ल्यु . छापछडे | पो.नि .बि.सं. (वाह.) | मध्यवर्ती भांडार, पुणे | रु.१००० /- सी नोट |
| ०२ | श्री.एस.डी. लोहकरे | सपोउनि/प्र.यं.चा. | नियोजन शाखा, पुणे | रु.७५०/- जीएसटी |
| ०३ | श्रीमती एन.ए.सावंत | पो.हवा./ य.ंचा. | गो.न.पा.यो. पुणे | रु. ५००/- जीएसटी |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७ / ७०६ / बक्षीस / २०१७ /१५४८, दि.२२/०३/२०१७ )**

१५. कामगिरीचा तपशील :- अपर पोलीस महासंचालक , गु.अ.वि. अपर पोलीस महासंचालक बि.सं., पोलीस आयुक्त, पुणे शहर, अमरावती शहर, औरंगाबाद शहर, सोलापुर शहर, वि.पो.म.नि.गु.अ.वि.अमरावती, औरंगाबाद व कोल्हापुर परिक्षेत्रातील वरिष्ठ पोलीस अधिक्षक, पोलीस उप-आयुक्त यांच्याकरीता खालील नमुद

अ.क्र. १ यांनी स्टॅटेजी सपोर्ट सिस्टीम बाबत अभ्यासपूर्वक नियोजन व पुर्वतयारी करुन पोलीस महासंचालक कार्यालय, म.रा.मुंबई यांच्या कार्यालयातुन व्हीडीओ कॉन्फरन्सींग व्दारे थेट प्रात्याक्षिक सादर केले. त्यांचे मार्गदर्शनानुसार त्यांचे अधिपत्याखालील नवप्रविष्ठ कर्मचारी हे वर नमूद केलेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सींगच्या ठिकाणी जाऊन त्यांनी प्रात्यक्षिकाच्या सुरुवातीपासुन शेवटपर्यंत उपस्थित राहुन सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना व्हीडीओ कॉन्फरन्सींग व तांत्रिक बाबीमध्ये उत्तम प्रकारे मदत केली. याकरीता सदर नवप्रविष्ठ कर्मचारी यांनी रात्री प्रवास करुन विविध ठिकाणाच्या व्हीडीओ कॉन्फरन्सींग ठिकाणी सकाळी मुदतीत उपस्थित राहिलेले आहेत. त्यांच्या या कृतीमुळे प्रात्याक्षिकाचे प्रक्षेपण हे अखंडीत व सुलभपणे ४० पेक्षा जास्त पोलीस अधिकारी यांचेसाठी व्हीडीओ कॉन्फरन्सींगव्दारे एकाचवेळी प्रदर्शित करणे शक्य झाले आहे. या उत्कृष्ठ कामगिरीबाबत खालील नमूद कर्मचारी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-ा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री ए.सी.महिंद्रकर | सपोउपनि / रेयां | संशोधन व विकास, पुणे | रु.५०० /- व जीएसटी |

१६. कामगिरीचा तपशील :- खालील नमूद कर्मचारी यांनी एम.आर.एस.ए.सी. च्या सहकार्यातुन महाराष्ट्र राज्य पोलीसांचे अधिकृत संकेत स्थळावर स्ट्रॅटेजी सपोर्ट सिस्टीमची पहिली आवृत्ती भारताच्या ६८ व्या प्रजासत्ताक दिनी दि. २६/०१/२०१७ रोजी सुरु केली. व स्ट्रॅटेजी सपोर्ट सिस्टीमची व त्याच्या वापराची प्रमाणीत पध्दतीची माहिती ही सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी तसेच घटक प्रमुख (पोलीस अधिक्षक -पोलीस उप-आयुक्त यांचेपेक्षा वरिष्ठ पोलीस अधिकारी) यांना एसएमएसव्दारे प्रसारीत केली. श्री. महिंद्रकर यांना त्यांचे सहका-यांचे लाभलेले सहकार्य सुनियोजन व पुर्वतयारी यामुळे अल्पवधीत स्ट्रॅटेजी सपोर्ट सिस्टीम कार्यन्वित करणे सहज सुलभ व शक्य झाले. या उत्कृष्ठ कामगिरीबाबत खालील नमूद कर्मचारी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-ा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री ए.सी.महिंद्रकर | सपोउपनि / रेयां | संशोधन व विकास, पुणे | रु.५०० /- व जीएसटी |

१७. कामगिरीचा तपशील :- पोलीस आयुक्त नवी मुंबई , विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र व तेथील सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी, पोलीस आयुक्तालय नवी मुंबई येथील पोलीस अधिक्षक, पोलीस उप-आयुक्त यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी यांचेकरीता श्री. महिंद्रकर यांनी स्ट्रॅटेजी सपोर्ट सिस्टीम बाबत अभ्यासपूर्वक नियोजन व पूर्वतयारी करुन व्हीडीओ कॉन्फरन्सींगव्दारे थेट प्रात्याक्षिक सादर केले. श्री. महिंद्रकर यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांच्या अधिपत्याखालील नवप्रविष्ठ कर्मचारी हे वर नमूद केलेल्या विविध व्हिडिओ कॉन्फरन्सींगच्या ठिकाणी जाऊन त्यांनी प्रात्याक्षिकाच्या सुरुवातीपासुन शेवटपर्यंत उपस्थित राहुन सर्व वरीष्ठ अधिकारी यांना व्हीडीओ कॉन्फरन्सींग व तांत्रिक बाबींमध्ये उत्तम मदत केली. या उत्कृष्ठ कामगिरीबाबत खालील नमूद कर्मचारी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-ा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री ए.सी.महिंद्रकर | सपोउपनि / रेयां | संशोधन व विकास, पुणे | रु.३०० /- व जीएसटी |

१८. कामगिरीचा तपशील :- ठाणे शहर करीता अ.क्र.१ यांनी स्ट्रॅटेजी सिस्टीमबाबत अभ्यासपूर्वक नियोजन व पूर्वतयारी करुन संबंधीत तांत्रिक बाबी विचारात घेऊन प्रात्याक्षिक सादर केले. सदरवेळी त्यांनी सक्रीयतेने चर्चेत सहभाग घेऊन या संबंधाने पोलीस आयुक्त, ठाणे शहर व अन्य वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या सर्व शंकाचे समाधानकारक निरसन केले. या कामी त्यांना अ.क्र.२ यांनी आवश्यक ती मदत केली. या उत्कृष्ठ कामगिरीबाबत खालील नमूद कर्मचारी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-I | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री ए.सी.महिंद्रकर | सपोउपनि / रेयां | संशोधन व विकास, पुणे | रु.३०० /-व जीएसटी |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-७ / ७०६ / बक्षीस / २०१७ /१५१३ , दि.२१/०३/२०१७ )**

१९. कामगिरीचा तपशील :-अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि. अपर पोलीस महासंचालक ,बि.सं. पोलीस आयुक्त, पुणे शहर, अमरावती शहर, सोलापुर शहर, वि.पो.म.नि.गु.अ.वि.अमरावती, औरंगाबाद व कोल्हापुर परिक्षेत्रातील वरिष्ठ पोलीस अधिक्षक, पोलीस उपआयुक्त यांच्याकरीता श्री. ए.सी.महिंद्रकर, सपोउनि/रेयां, संशोधन व विकास , पुणे यांनी स्ट्रॅटेजी सपोर्ट सिस्टीम बाबत अभ्यासपुर्वक नियोजन व पुर्वतयारी करुन पोलीस महासंचालक कार्यालय, म.रा. मुंबई यांच्या कार्यालयातुन व्हीडीओ कॉन्फरन्सींगव्दारे थेट प्रात्याक्षिक सादर केले. त्यांचे मार्गदर्शनानुसार त्यांचे अधिपत्याखालील नवप्रविष्ठ कर्मचारी हे वर नमूद केलेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सींगच्या ठिकाणी जाऊन त्यांनी प्रात्याक्षिकाच्या सुरुवातीपासुन शेवटपर्यंत उपस्थित राहुन सर्व वरीष्ठ पोलीस अधिकारी यांना व्हिडीओ कॉन्फरन्सींग व तांत्रिक बाबीमध्ये उत्तम प्रकारे मदत केली. या करीता ते रात्री प्रवास करुन विविध ठिकाणच्या व्हिडीओ कॉन्फरन्सींग ठिकाणी सकाळी मुदतीत उपस्थित राहीलेले आहेत. त्यांच्या या कृतीमुळे प्रात्याक्षिकाचे प्रक्षेपण हे अखंडित व सुलभपणे ४० पेक्षा जास्त पोलीस अधिकारी यांचेसाठी व्हिडीओ कॉन्फरन्सींग एकाचवेळी प्रदर्शित करणे शक्य झाले आहे. या उत्कृष्ठ कामगिरीबाबत खालील नमूद कर्मचारी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-I | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री ए.ए.खराडे | सपोउपनि / रेयां | औरंगाबाद परिक्षेत्र | रु.५०० /- व जीएसटी |
| ०२ | श्री.एन.एस.आंधळकर | सपोउपनि / रेयां | ठाणेशहर | रु.५०० /- व जीएसटी |
| ०३. | श्री.ए.एस.पाटील | सपोउपनि / रेयां | मुंबई शहर | रु.५०० /-व जीएसटी |
| ०४. | श्री.जी. आर.जोशी | सपोउपनि / रेयां | औरंगाबाद परिक्षेत्र | रु.५०० /- व जीएसटी |
| ५. | श्री.एस.डी.गिरी | सपोउपनि / रेयां | रत्नागिरी | रु.५०० /- व जीएसटी |

२०. कामगिरीचा तपशीलः- पोलीस आयुक्त नवी मुंबई, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र व तेथील सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी, पोलीस आयुक्तालय नवी मुंबई येथील पोलीस अधिक्षक, पोलीस उप आयुक्त यांच्यापेक्षा वरीष्ठ दर्जाचे अधिकारी यांचेकरीता श्री.ए.सी.महिंद्रकर सपोउनि/रेयां, संशोधन व विकास , पुणे यांनी स्ट्रटेजी सपोर्ट सिस्टीम बाबत अभ्यासपुर्वक नियोजन व पुर्वतयारी करुन व्हिडीओ कॉन्फरन्सींगव्दारे थेट प्रात्याक्षिक सादर केले. श्री. महिंद्रकर यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांच्या अधिपत्याखालील नवप्रविष्ठ कर्मचारी हे वर नमुद केलेल्या विविध व्हिडीओ कॉन्फरन्सींगच्या ठिकाणी जाऊन त्यांनी प्रात्याक्षिकाच्या सुरुवातीपासुन शेवटपर्यंत उपस्थित राहुन सर्व वरीष्ठ पोलीस अधिकारी यांना व्हिडीओ कॉन्फरन्सींग व तांत्रिक बाबींमध्ये उत्तम मदत केली. या उत्कृष्ठ कामगिरीबाबत खालील नमूद कर्मचारी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-I | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री ए.ए.खराडे | सपोउपनि / रेयां | औरंगाबाद परिक्षेत्र | रु.३०० /- व जीएसटी |
| ०२ | श्री.एन.एस.आंधळकर | सपोउपनि / रेयां | ठाणे शहर | रु.३०० /- व जीएसटी |

२१. कामगिरीचा तपशीलः-ठाणे शहर करीता श्री. ए.सी.महिंद्रकर , सपोउनि/रेयां, संशोधन व विकास, पुणे यांनी स्ट्रॅटेजी सपोर्ट सिस्टीमबाबत अभ्यासपुर्वक नियोजन व पुर्वतयारी करुन संबंधित तांत्रिक बाबी विचारात घेऊन प्रात्यक्षिक सादर केले. सदरवेळी त्यांनी सक्रीयतेने चर्चेत सहभाग घेऊन या संबंधाने पोलीस आयुक्त, ठाणे शहर व

अन्य वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या सर्व शंकाचे समाधानकारक निरसन केले. या कामी त्यांना खालील नमूद कर्मचारी यांनी आवश्यक ती मदत केली. या उत्कृष्ठ कामगिरीबाबत खालील नमूद कर्मचारी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-ा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री ए.ए.खराडे | सपोउपनि / रेयां | औरंगाबाद परिक्षेत्र | रु.३०० /-व जीएसटी |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे कार्या. आदेश क्र.ई-७ / ७०६ / बक्षीस / २०१७ /१५१२, दि.२१/०३/२०१७ )**

२२. कामगिरीचा तपशील :-खालील नमुद कर्मचारी यांनी रेडिओ यांत्रिकी, वीजतंत्री व यंत्रचालक यांचे वर्गीकरण / प्रविण्य परिक्षा -२०१६ मध्ये घेण्यात आली होती. सदर परिक्षेचे वेळापत्रक तयार करणे, परिक्षेचे ठिकाण नमुद करणे, त्यांना आसन क्रमांक देणे याबाबतची कामे वेळेत, बिनचूक कार्यालयीन वेळेपेक्षा जास्तवेळ थांबून व शासकीय सुट्टी दिवशी कर्तव्यावर येऊन सर्व कामे योग्यरीतीने पार पाडली. तसेच सदरहु परिक्षेकामी उमेदवारांप्रमाणे उत्तर पत्रिका व पुरवणी पत्रिका पुरविणे तसेच परिक्षा संपलेनंतर उर्वरित उत्तर व पुरवणी पत्रिका जमा करुन घेणे ही सर्व कामे शासकीय सुट्टी दिवशी कार्यालयात येऊन योग्यरीतीने पार पाडली. सदर कामे वेळेत योग्यरितीने व बिनचुक पार पाडली. तसेच सदरहु लेखी परिक्षेमध्ये पास झालेल्या कर्मचा-यांचे प्रात्याक्षिक परिक्षा घेणेकरीता त्यांना आसन क्रमांक देणे तसेच परिक्षा पूर्ण झालेनंतर निकाल वेळेत जाहीर करुन संबंधित घटकांना वेळेत अदा केले. सदरबाबतचे कामकाज उत्कृष्टपणे केलेबाबत खालील नमूद कर्मचारी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-ा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. आर.एस.आंबीकर | पो.हवा./बियंचा | म.त.का.पुणे | रु.५०० /- व जीएसटी |

२३. कामगिरीचा तपशील :-हिवाळी अधिवेशन बंदोबस्त २०१६ मध्ये दि. ०५/१२/२०१६ ते १७/१२/२०१६ दरम्यान नागपुर शहर, पोलीस आयुक्त, व्ही-सॅट स्थानक बाहेरील जिल्हातुन व इतर ठिकाणांहुन येणारे अतिमहत्वाचे संदेश देवाण-घेवाण करुन मोलाची कामगिरी केलेली आहे. सदरबाबतचे कामकाज उत्कृष्टपणे केलेबाबत खालील नमूद कर्मचारी यांना उत्तेजनार्थ बक्षीस मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव | हु-ा | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती बी.ए.लहांगे | पो.हवा./बियंचा | ''क''शाखा संचालक कार्यालय, पुणे | रु.१५० /- व जीएसटी |
| ०२ | श्रीमती. एस.घुमे | पो.हवा./ बियंचा | म.त.का पुणे | रु.१५० /- व जीएसटी |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे कार्या. आदेश क्र.ई-७ / ७०६ / बक्षीस / २०१७ /१५९७, दि.२७/०३/२०१७ )**

**६. शिक्षा :- निरंक**

**७. निधनः-**

**१)** श्री. जगदीश बिजल राठोड, पोलीस हवालदार (सहायक भांडारपाल ) नेमणुक बिनतारी संदेश विभाग, ठाणे शहर यांचे दिनांक ०५/०३/२०१७ रोजी दुःखद निधन झाल्याने, त्यांचे नाव बिनतारी संदेश विभागाच्या सर्व शासकीय अभिलेखातून दिनांक ०५/०३/२०१७ पासुन कमी करण्यात येत आहे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र. ई-४/मृत्यु /पोहवा (सभांपा)राठोड /२०१७/१२८८ दि.०९/०३/२०१७)**

२) श्री.वाघ सुनिल भाऊसाहेब रेयां/ सपोउपनि नेमणुक बि.सं, क्रं.७ दौंड यांचे दिनांक १५/०३/२०१७ रोजी दुःखद निधन झाल्याने, त्यांचे नाव बिनतारी संदेश विभागाच्या सर्व शासकिय अभिलेखातुन दिनांक १५/०३/२०१७ पासुन कमी करण्यात येत आहे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-२/ई-८/शोक संदेश/वाघ/२०१७/१६५७ दि.२९/०३/२०१७)**

३) श्री. विकास विष्णु पंडित, पोलीस हवालदार (बिनतारी यंत्रचालक) नेमणुक बिनतारी संदेश विभाग, मुंबई यांचे दिनांक ०६.०३.२०१७ रोजी पहाटे ०३.४५ वाजता दुःखद निधन झाल्याने त्यांचे नाव बिनतारी संदेश विभागाच्या सर्व शासकीय अभिलेखातुन दिनांक ०६.०३.२०१७ पासुन कमी करण्यात येत आहे.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.ई-३/मृत्यु /पोहवा (बियंचा)/ पंडीत /२०१७/१६६६ दि.२९/०३/२०१७)**

८. **संकीर्ण :- निरंक**

दिनांक : १७/०४/२०१७

**sd/-**
**(ई.दा.कांबळे)**
**पोलीस अधीक्षक, बि.सं. (मुख्या),**
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश, म.रा.पुणे, कार्यालय